मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 16 जुलै 2024 | पान- 1

# धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ

## गेल्या दोन-तीन दिवसांत दमदार पाऊस : 1 जूनपासून 743 मिलीमीटर पाऊस झाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यात गेल्या दोन-तीन दिवसांत दमदार पाऊस झाल्याने तालुक्यातील पवनेसह महत्त्वाच्या धरणांतील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. पवना धरणात ८.५ टक्के इतकी वाढ झाली असून पाणीसाठा ३३.२६ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. या धरण परिसरात रविवारी (ता.१४) ८१ मिलीमीटर तर १ जूनपासून आत्तापर्यंत ७४३ मिलीमीटर एवढा पाऊस झाला आहे.

मान्सून लांबल्यामुळे तालुक्यातील धरणांतील पाणीसाठ्याने तळ गाठला होता. पावसाळ्याचा दीड महिना संपला तरी दमदार पाऊस झाला नव्हता. शुक्रवार ते रविवार या तीन दिवसांत मात्र दमदार पाऊस झाला. नद्या, नाले, दुथडी भरून वाहू लागले आहेत. भात खाचरे तुडुंब भरली. तालुक्यातील धरणांतील आवक वाढल्यामुळे पाणीसाठ्यातही लक्षणीय वाढ होऊ लागली आहे.

पूर्व भागातील जाधववाडी धरणात सध्या ४२.६७ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती जाधववाडी धरणाचे शाखाधिकारी किशोर चव्हाण यांनी दिली. महिन्याभरापूर्वी धरणात ३०.८५ टक्के तर १३ जुलै रोजी ३०.४३ टक्के पाणीसाठा होता. दमदार पावसामुळे दोन दिवसांत पाणीसाठ्यात १२.२४ टक्के वाढ झाली आहे.



### आंद्रा धरणात 33.57 टक्के पाणीसाठा

» आंदर मावळातील आंद्रा धरणात सध्या ३३.५७ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती शाखाधिकारी माणिक शिंदे यांनी दिली. महिन्याभरापूर्वी धरणात २५ टक्के तर १३ जुलै रोजी २६ टक्के पाणीसाठा होता. दमदार पावसामुळे दोन दिवसांत पाणीसाठ्यात ७.५७ टक्के वाढ झाली आहे. धरण परिसरात रविवारी ४९ मिलीमीटर पाऊस झाला; तर आत्तापर्यंत एकूण ३४० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### पवना धरणात 8.5 टक्के वाढ

» पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात सध्या ३३.२६ टक्के पाणीसाठा झाला आहे. महिन्याभरापूर्वी धरणात २० टक्के तर १३ जुलै रोजी २४.८३ टक्के इतका पाणीसाठा होता. दमदार पावसामुळे दोन दिवसांत पाणीसाठ्यात ८.५ टक्के एवढी वाढ झाली आहे.

### वडिवळे धरणात 72.72 टक्के पाणीसाठा

» नाणे मावळातील वडिवळे धरणात सध्या ७२.७२ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती शाखाधिकारी संतोष शिंदे यांनी दिली. महिन्याभरापूर्वी धरणात ४२ टक्के; तर १३ जुलै रोजी ५५ टक्के पाणीसाठा होता. दमदार पावसामुळे दोन दिवसांत पाणीसाठ्यात १७.७७ टक्के वाढ झाली आहे. धरण परिसरात रविवारी १०५ मिलीमीटर तर आत्तापर्यंत एकूण ९०४ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

> आंद्रा, वडिवळे व जाधववाडी धरण लाभक्षेत्रात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस चालू आहे. या पावसाचा परिणाम म्हणून इंद्रायणी नदीवरील देहू ते तुळापूर येथील सर्व कोल्हापुरी बंधाऱ्यांमधील पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. तरी नागरिकांनी कोल्हापुरी बंधाऱ्यावर जलपर्यटन अथवा वाहतुकीसाठी जाऊ नये.
>
> **- किशोर चव्हाण, सहायक अभियंता श्रेणी-२, पाटबंधारे शाखा, मोशी**

---

# आमदार अमित गोरखे यांचे भव्य अभूतपूर्व स्वागत

## विजयानिमित्त पिंपरी चिंचवड शहर भाजपा व अमित गोरखे मित्र परिवाराच्या वतीने भव्य विजयी रॅली काढण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानपरिषद निवडणुकीत भाजपा महायुतीचे ९ च्या ९ उमेदवार विजयी झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रणनीती यशस्वी ठरली. महाविकास आघाडीच्या काही आमदारांनी महायुतीला पाठिंबा दर्शविला. या ९ उमेदवारां पैकी देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू व निकटवर्तीय अशी ओळख असणारे पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे यांचा विजय झाला.

या विजयानिमित्त पिंपरी चिंचवड शहर भाजपा व अमित गोरखे मित्र परिवाराच्या वतीने भव्य विजयी रॅली काढण्यात आली. या रॅलीचे नियोजन पिंपरी विधानसभा क्षेत्रातील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक भक्ती शक्ति चौक ते दापोडी, पिंपरी, मोरवाडी, संभाजीनगर शाहूनगर थरमॅक्स चौक येथे करण्यात आला. या विजयाबरोबर अमित गोरखे यांच्या रुपाने पिंपरी चिंचवड शहराला भाजपाचे ४ थे आमदार मिळाले आहेत. या अभूतपूर्व रॅलीमध्ये भाजपा पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष शंकरभाऊ जगताप, भोसरी विधानसभा आमदार महेश लांडगे, पिंपरी चिंचवड मनपा माजी महापौर माई ढोरे, प्रदेश भाजपा युवा मोर्चा सचिव अनुप मोरे, सरचिटणीस शितल शिंदे, नगरसेविका अनुराधा गोरखे, पिंपरी-चिंचवड भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष तुषार हिंगे, माजी नगरसेविका सौ कमलताई घोलप, बापू घोलप, उत्तम केंदळे दक्षिण भारतीय आघाडीचे अध्यक्ष राजेश पिल्ले, पिंपरी चिंचवड भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सौ. सुजाता पालांडे, पिंपरी चिंचवड भाजपा ओबीसी महिला मोर्चा अध्यक्ष सौ रोहिणी रासकर, श्री निलेश अष्टेकर, राजेंद्र बाबर, कैलास कुटे, अतुल इनामदार, गणेश लंगोटे, देवदत्त लांडे, प्रकाश तात्या जवळकर, रघुनाथ जवळकर, प्रतिभा जवळकर, स्वीकृत नगरसेवक संजय कणसे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, स्वीकृत नगरसेविका वैशाली खाडे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन घोलप, संदीपान झोंबाडे, शिवाजी साळवे, राजू आवळे, राहुल खुडे, आनंद शिंदे, सागर फुगे निलेश अष्टेकर, मंगेश घाडगे, महेंद्र बाविस्कर राहुल खाडे, सुरेश गदिया, विशाल वाळुंजकर, गणेश वाळुंजकर,जयेश चौधरी, मनू जेठवणी, गोपी आस्वानी, शिवसेनेचे जितेंद्र ननावरे, शिवसेना नेते विश्वजीत बारणे, तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व शहरातील पदाधिकारी या रॅलीला उपस्थित होते.



### सर्व समाजासाठी सेवा करण्याचा प्रयत्न

» अमित गोरखे म्हणाले म्हणाले की, भविष्यात सर्व समाजासाठी सेवा करण्याचा मी मनोभावे प्रयत्न करेल. महाराष्ट्रात लवकरच दौऱ्याचं आयोजन केले जाईल व महाराष्ट्रातील खास करून अनुसूचित जाती जमातींसाठी विशेष काम करण्याचा माझा प्रयत्न असेल, शिक्षणाला धरून प्रगती अद्यास ठेवून मी काम करेल.

# धोकादायक पर्यटन करणाऱ्या 12 जणांवर गुन्हा

## लोणावळा पोलिसांची कारवाई, हुल्लडबाजी करणाऱ्या सात पर्यटकांवर टायगर पॉइंट परिसरात पाच जणांवर गुन्हा दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

लोणावळा येथील सहारा पुलाच्या समोरील डोंगरावर असलेल्या धबधब्यांच्या मागील बाजूला धोकादायकपणे डोंगरात फिरणाऱ्या ७ पर्यटकांवर वन विभागाने लोणावळा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. तसेच टायगर पॉइंटवर हुल्लडबाजी करणाऱ्या ५ अशा एकूण १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वन कर्मचारी संदीप रामगुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सहारा पूल परिसरात सुधर्म नितीन शेटे व संतोष पंडित (दोघेही राहणार भिलार ता. महाबळेश्वर जि. सातारा), दीनानाथ सुरेंद्र पासवान (रा. चारकोपमाय कोळीवाडा कांदिवली वेस्ट मुंबई), लवकुश सोहनलाल गुप्ता व रविकुमार बबलू कुमार गौतम (दोघेही रा. डिगेश्वर कांदिवली वेस्ट मुंबई), ऋषीकेश श्रीधरराव साळुंके (रा. दत्तनगर जि. बीड), तनमय अजय तेलवेणे (रा. बेदवाडा मुरबाड मुंबई) या सात पर्यटकांवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारपासून जोरदार पाऊस सुरू असल्याने धबधबे वहात आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव पोलिस व वन विभाग यांची संयुक्त गस्त सुरू होती. वनपाल एस. डी. चुटके, वन कर्मचारी संदीप रामगुडे, लोणावळा शहरचे पोलिस निरीक्षक सुहास जगताप, महिला पोलिस उपनिरीक्षक दीपाली पाटील मॅडम, पोलिस कॉन्स्टेबल पवन कराड, रईस मुलाणी यांचे पथक पेट्रोलिंग करत होते. पोलिस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार शकील शेख हे तपास करत आहेत.

हुल्लडबाजी करणाऱ्या पाच पर्यटकांवर टायगर पॉइंट परिसरात पाच जणांवर गुन्हा दाखलकरण्यात आला. जितेंद्र रमेश वाकळे (वय ३७, रा. पनवेल, रायगड), सागर रमेश वाकळे (३४, रा. भिवंडी, ठाणे), अंकुश रामचंद्र वाकळे (४३, रा. भिंवडी, ठाणे), हेमंत सुरेंद्र ढसाळ (३३, रा. भायखळा, मुंबई), किरण भासकर सोनावणे (३३, रा. चांदणी कोळीवाडा, ठाणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती लोणावळा ग्रामीणचे पोलिस निरीक्षक किशोर धुमाळ यांनी दिली.



### दोन दिवसांपासून जोरदार पाऊस

» दरम्यान शनिवारपासून लोणावळा परिसरात जोरदार पाऊस सुरू असल्याने धबधबे मोठ्या प्रमाणात प्रवाहित झाले आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस व वन विभाग यांची संयुक्त कारवाई गस्त घालत असताना या १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाच्या या कारवाईमुळे आता पर्यटनासाठी येणाऱ्यांवर निश्चितच वचक बसणार आहे.

### टायगर पॉइंटवर हुल्लडबाजांवर गुन्हा दाखल..

» हुल्लडबाजी करणाऱ्या पाच पर्यटकांवर टायगर पॉइंट परिसरात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. जितेंद्र रमेश वाकळे (वय ३७, रा. पनवेल, रायगड), सागर रमेश वाकळे (३४, रा. भिवंडी, ठाणे), अंकुश रामचंद्र वाकळे (४३, रा. भिंवडी, ठाणे), हेमंत सुरेंद्र ढसाळ (३३, रा. भायखळा, मुंबई), किरण भासकर सोनावणे (३३, रा. चांदणी कोळीवाडा, ठाणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती लोणावळा ग्रामीणचे पोलिस निरीक्षक किशोर धुमाळ यांनी दिली.

### जिल्हाधिकारी यांचे बंदी आदेश

» जिल्हाधिकारी यांचे बंदी आदेश असताना व त्याबाबत जागृती करणारे मोठे फलक लावलेले असताना देखील काही तरुण पर्यटक डोंगरावर फिरत होते. वन विभाग व लोणावळा शहर पोलीस यांनी डोंगरावर जाऊन पर्यटकांना ताब्यात घेत ही संयुक्त कारवाई केली आहे.

# सिव्हील कोर्ट मेट्रो स्टेशन आता 'डिस्ट्रीक्ट कोर्ट' पुणे

## बार असोसिएशनच्या पाठपुराव्याला यश, लवकरच नवीन नामफलक लावण्यात येणार !

**पुणे | प्रतिनिधी**

सिव्हील कोर्ट मेट्रो स्टेशनचे नाव आता 'डिस्ट्रीक्ट कोर्ट, पुणे' असे झाले आहे. याबाबत केंद्र सरकारने नुकतीच अधिसुचना जारी केली आहे. लवकरच याची अंमलबजावणी होणार आहे. जिल्ह्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनने नाव बदलासाठी पाठपुरावा केला होता. त्याला यश आले आहे.

शहरात मेट्रो सुरू झाली. तेव्हापासून शिवाजीनगर न्यायालय येथील स्टेशनला सिव्हील कोर्ट असे नाव देण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. शिवाजीनगर येथील जिल्हा न्यायालयात सिव्हील म्हणजे दिवाणी दावे चालतातच.

मात्र, फौजदारी, मोटार अपघात न्यायप्राधिकरणसह विविध प्रकारचे दावे चालतात. जवळच कौटुंबिक न्यायालय सुध्दा आहे. त्यामुळे सिव्हील एवढे मर्यादीतच का नाव दिले आहे, असा प्रश्न निर्माण झाला होता. वकिलांमध्ये याबाबत नाराजी होती.

तर सर्वसामान्य नागरिकांना सिव्हील आणि सत्र न्यायालय एक आहे का वेगळे, असा प्रश्न निर्माण होत होता. त्यामुळे सिव्हील कोर्ट नाव बदलण्याची मागणी वकिलांसह सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत होती. पुणे बार असोसिएशनकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत होता.

येथील न्यायालयाला शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालय संबोधले जाते. मात्र, स्टेशनचे नाव सिव्हील कोर्ट होते. त्यामुळे शिवाजीनगर व सिव्हील कोर्ट एक की वेगळे हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडायचा. सिव्हील नावावरून वकील वर्गामध्येही नाराजी होती. त्यामुळे नाव बदलण्यासाठी मेट्रोकडे पाठपुरावा केला. त्याला यश आले आहे.




> न्यायालयाला शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालय संबोधले जाते. मात्र, स्टेशनचे नाव सिव्हील कोर्ट होते. त्यामुळे शिवाजीनगर व सिव्हील कोर्ट एक की वेगळे हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडायचा. सिव्हील नावावरून वकील वर्गामध्येही नाराजी होती. त्यामुळे नाव बदलण्यासाठी मेट्रोकडे पाठपुरावा केला. त्याला यश आले आहे.
>
> **- ॲड. संतोष खामकर, अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन**

> हा निर्णय स्वागतार्ह आहे. हे जिल्हा सत्र न्यायालय आहे. येथे फौजदारी, दिवाणी, लघुवाद, कौटुंबिक, मोटार अपघात न्यायप्राधिकरणासह विविध प्रकारचे दावे चालतात. मात्र, सिव्हील कोर्ट नाव दिल्यामुळे त्यापुरते मर्यादीतच कोर्ट आहे का, असा प्रश्न निर्माण व्हायचा. या पार्श्वभूमीवर डिस्ट्रीक्ट कोर्ट, पुणे नाव परिपूर्ण आहे.
>
> **- हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो**

# ऑनलाईन सेवेमुळे वाढला गल्ला

## दिवसाकाठी 70 लाख रुपयांचे उत्पन्न : तांत्रिक त्रुटी दूर करण्याची प्रवाशांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

सार्वजनिक वाहतूक सेवेचा दुवा असणाऱ्या एसटी महामंडळाने देखील डिजिटलायझेशनची कास धरली आहे. प्रवाशांना सोयीस्कर अशा क्यूआरकोडच्या माध्यमातून तिकीट सुरू झाल्याने रांगा आणि वेळ या दोन्हीची बचत होत असल्याचे दिसून आले आहे. शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागात देखील मोठ्या प्रमाणात ऑनलाइन सेवेचा वापर करण्यात येत आहे. मात्र, या ऑनलाइन सेवेमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यात याव्या, अशी मागणी प्रवासी करत आहेत. ऑनलाइनच्या माध्यमातून दिवसाकाठी ७० लाखांचे उत्पन्न एसटी महामंडळाला मिळत आहे

एसटीतही 'क्यूआर कोड'ने तिकिटाची रक्कम अदा करता येत आहे. डिसेंबरपासून ही सुविधा सुरू झाली असून, या सुविधेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.




दिवसाला ऑनलाइन तिकिटाच्या माध्यमातून ७० लाखांचा, तर महिन्याला १७ कोटी उत्पन्नाचा टप्पा ओलांडला असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले. नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी एसटी महामंडळाने सेवेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या सर्व बसमध्ये ११ डिसेंबरपासून पहिल्या टप्प्यात 'यूपीआय', 'क्यूआर कोड'च्या माध्यमातून तिकीट देण्याची सोय सुरू झाली. या सुविधेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे.

तिकीट काढण्यासाठी अथवा चौकशीसाठी एसटी स्थानकावर प्रवाशांच्या मोठा रांगा लागलेल्या पाहण्यास मिळतात. परिणामी, प्रवाशांचा वेळ वाया जातो. त्यामुळे एसटीकडे प्रवाशांची पाठ फिरत होती. परिणामी, खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडे या प्रवाशांचा ओढा झाला होता. मात्र आता सध्याच्या स्पर्धात्मक युगाप्रमाणे एसटीनेही बदल करून ऑनलाइन सेवा दिली आहे. त्यामुळे प्रवासी संख्या वाढून उत्पन्नातही मोठ्या प्रमाणात भर पडत आहे. ११ डिसेंबर ते ३० जूनपर्यंत २३ लाख ८२ हजार १९६ प्रवाशांनी ऑनलाइन तिकीट काढले आहे. यातून एसटी महामंडळाला ५४ कोटी ६३ लाख ४ हजार ४९४ रुपये उत्पन्न मिळाले आहेत. विशेष म्हणजे जून महिन्यात सर्वाधिक ९ लाख प्रवाशांनी ऑनलाइन पेमेंट केले आहे; तसेच दिवसाला ७० लाख उत्पन्नाचा टप्पा ओलांडला आहे. ग्रामीण भागातही ऑनलाइन सुविधेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विविध ग्रामीणमध्येही या सेवेला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, एसटी महामंडळाचे सेवा देणारे ॲप मध्यंतरी ठप्प झाले होते. तिकीट काढणे, पैसे भरणे यासह अनेक समस्यांना प्रवाशांना तोंड द्यावे लागले. अनेक प्रवाशांनी तिकिटाचे पैसे भरूनही तिकीट मिळाले नसल्याच्या तक्रारी होत्या. तर, ता तक्रारी घेऊन अनेक नागरिक एसटी स्थानकामध्ये दाखलही झाल्या होत्या. त्यामुळे त्या तांत्रिक त्रुटी दूर कराव्या अशी मागणी प्रवाशांकडे होऊ लागली आहे.

### इथे येणार तक्रार करता

» पैसे गेल्यानंतरही तिकीट न मिळाल्यास तक्रार करता येईल. तिकीट काढताना मशिनवर स्कॅन केल्यानंतर खात्यातून पैसे वजा झाले व तिकीट नाही आले, तर प्रवाशांना तक्रार करता येणार आहे. ८८००६८८००६ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच wecare@aritelbank.com या ई-मेलवर तक्रार करू शकतात, अशी माहिती एसटी प्रशासनाने दिली.

# सांगवी-बोपोडी पूल वाहतुकीस होणार खुला

## वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पालिकेचा प्रयत्न : पूल नागरिकांसाठी खुला

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी व बोपोडी या दोन्ही भागात जोडणाऱ्या मुळा नदीवरील नवीन पुलाचे बांधकाम हे पुणे महापालिका व पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम टप्प्यात आले आहे. संयुक्त प्रयत्नातून राबवलेल्या या प्रकल्पाचा उद्देश महत्त्वाच्या भागातील वाहतूक कोंडी कमी करण्याचा असून लवकरच हा पूल नागरिकांसाठी खुला करण्यात येणार आहे.

पूल बांधणीसाठी येणारा खर्च हा पुणे महापालिका व पिंपरी-चिंचवड महापालिकेने ५०-५० टक्के असा विभागून करत आहेत. पुलाचे काम पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रगतीपथावर असून कामाची मूळ मुदत २४ महिने इतकी होती.



परंतु, राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्र राहुरी यांची काही भागातील जागा मिळण्यास विलंब झाल्याने या कामास ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पुलाच्या कामाची स्वीकृत निविदा रुपये ३२.३६ कोटी इतकी असून कामाच्या व्याप्तीमध्ये मुळा नदीवरील एकूण १२५ मीटर लांबीचा पूल प्रस्तावित आहे. तसेच यामध्ये एकूण २५ मीटर लांबीच्या ५ गाळ्यांचा समावेश आहे. १८ मीटर रुंदी असलेल्या या पुलाच्या दोन्ही बाजूस पादचारी मार्गाची सोय उपलब्ध असणार आहे.

> पुणे शहराच्या बाजूकडील पोहोच रस्ता हा ५४० मीटर तर पिंपरी-चिंचवड बाजूकडील पोहोच रस्ता हा ९५ मीटर लांबीचा आहे. ७६० मीटर लांबी असलेल्या या पुलामुळे सांगवी-बोपोडी हे अंतर कमी वेळेत पार करता येणार असून यामुळे ब्रेमेन चौक, औंध रावेत रस्ता, खडकी रस्त्यावरील रहदारी कमी होण्यास तसेच वाहतूक सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे. सद्यस्थितीत पुलाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. लवकरच हा पूल नागरिकांसाठी खुला करण्यात येईल.
>
> - श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, महापालिका.

### प्रकल्पातील ठळक मुद्दे

» प्रकल्पाची किंमत : ३२.३६ कोटी रुपये
» पुलाची लांबी : २५ मीटरच्या पाच गाळ्यांसह १२५ मीटर
» पुलाची रुंदी : चार पदरी रस्त्यासह आणि पदपथांसह १८ मीटर
» दोन्ही हद्दीतील लांबी : ५४० मीटर (पुणे बाजू), ९५ मीटर (पिंपरी-चिंचवड बाजू)
» पूर्णता स्थिती : ९० टक्के काम पूर्ण, ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सेट
» फायदा : ब्रेमेन चौक, औंध-रावेत रोड आणि खडकी रोड येथे वाहतूक कोंडी होणार कमी

# पूजा खेडकर यांच्या आई नॉट रिचेबल!

## मनोरमा खेडकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्याने पोलिस त्यांच्याशी संपर्क साधत आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर चर्चेत आल्यानंतर त्यांच्या आई मनोरमा खेडकरही गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. त्यांचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हायरल व्हिडिओमध्ये त्या हातात पिस्तुल घेऊन गावकऱ्यांना धमकावत असल्याचं दिसत होतं. याप्रकरणी पुणे पोलिसांनी त्यांच्यासह पाचजणांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे त्यांची चौकशी करण्याकरता पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



मनोरमा खेडकर यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. व्हिडिओमध्ये त्या एका गावातील काही शेतकऱ्यांवर दमदाटी करत असल्याचं दिसत आहे. विशेष म्हणजे त्यांच्या हातात पिस्तुल दिसत असून त्यांच्यासोबत त्यांचे काही अंगरक्षकदेखील दिसून येत आहेत. एका जमिनीच्या मालकी हक्कावरून हा वाद झाल्याचं सांगितलं जात आहे. हा व्हिडीओ मुळशी तालुक्यातल्या धडवली गावातला असल्याचं सांगितलं जात आहे. संबंधित महिला हातात पिस्तुल घेऊन गावकऱ्यांना धमकावत आहे. त्यांच्या बाजूला त्यांचे अंगरक्षकही दिसत आहेत. काही शेतकरी "हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तुम्ही असं करू शकत नाहीत", असं सांगताना ऐकू येत आहेत. पण त्याचवेळी "मला कायदा सांगू नका, मला माहिती आहे सगळं, सातबाऱ्यावर माझं नाव आहे", असं त्या गावकऱ्यांना सांगत आहेत.

ही घटना घडली, तेव्हा यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. मात्र, आता या व्हिडिओवर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून पौड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पौड पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये मनोरमा खेडकर, त्यांचे पती दिलीप खेडकर, अंबादास खेडकर व इतर चार जणांची नावं आहेत. १२ जुलै रोजी शुक्रवारी रात्री हा गुन्हा दाखल करण्यात आला. मनोरमा खेडकर यांनी धमकावल्याची तक्रार काही स्थानिक शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार हा गुन्हा दाखल झाला असून त्यात कलम ३२३, ५०४. ५०६ नुसार नोंद करण्यात आली आहे. यामध्ये शस्त्रास्त्र कायद्याची कलमंही समाविष्ट करण्यात आल्याची माहिती पौड पोलीस स्थानकाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मनोज यादव यांनी दिली.

याप्रकरणी चौकशी करण्याकरता पुणे ग्रामीण पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी असलेले एक पथक शहरातील बाणेर रोड येथील मनोरमा यांच्या बंगल्यावर गेले होते, परंतु त्यांचा माग काढण्यात यश आले नाही, असे अधिकाऱ्याने सांगितले. "आम्ही रविवारी आणि आज त्यांच्या घरी भेट दिली, पण आवारात प्रवेश करू शकलो नाही. त्यांचा मोबाईलही बंद आहे. एकदा आम्ही ताब्यात घेतलं चौकशी केली जाईल आणि कायदेशीर कारवाई केली जाईल",असं अधिकाऱ्यांनी सांगितले.

### भीक मांगो आंदोलन..

» दरम्यान, मनोरमा खेडकर यांच्या विरोधात आज पुण्यात आंदोलन करण्यात आलं. शेतकऱ्याला पिस्तुल दाखवून धमकावल्याप्रकरणी मनोरमा यांच्यावर कारवाई करा, अशी मगाणी यावेळी आंदोलकांनी केली. यावेळी पुणेकरांनी भीक मांगो आंदोलन केलं. या आंदोलनात पुणेकर मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# पावसाची उघडीप; शेती कामाची लगबग सुरू

## पिकांना रासायनिक खते देणे, औषधी फवारणी करणे, वखरणे आदी कामांची लगबग

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यात सध्या पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकऱ्यांनी विविध पिकांच्या विशेषतः ऊस पिकाची लागण, ज्वारी, मका पेरणीला वेग दिला आहे. त्याचबरोबर परिसरात पिकांना रासायनिक खते देणे, औषधी फवारणी करणे, वखरणे आदी कामांची लगबगदेखील दिसून येत आहे.



इंदापूर तालुक्यात जूनच्या शेवटच्या आठवड्यात व जुलैच्या सुरवातीला जोरदार पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना चांगलाच दिलासा मिळाला. यादरम्यान पावसाची सतत रिपरिप सुरू होती. पावसामुळे शेतातील विशेषतः बागायती शेतातील पिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर तण वाढले.

सततच्या पावसामुळे पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकांना औषधी फवारणी करणे, खते देणे, पिकांची मशागत करणे आवश्यक होते. आता पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांकडून ही कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून ज्वारी पेरणी, ऊस लागण, मका तसेच जनावरांसाठी चारा लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू असून परिसरात सध्या काही शेतकऱ्यांडून बैलजोडीद्वारे, तर काही शेतकऱ्यांकडून ट्रॅक्टरद्वारे पेरणी करण्यात येत आहे. विविध शेतीच्या कामांनादेखील शेतकऱ्यांकडून वेग देण्यात आला आहे.

तालुक्यात पावसाने उघडीप दिल्यामु अनेक ठिकाणी उसाची लागवडीस सुरुवात झाली आहे; बियाणे महाग झालं आहे. उसाचं बियाणे सहा ते सात हजार रुपये असल्याने यंदाची उसाची लागवड महाग झाली आहे. शिवाय उसाची लागवड करण्यासाठी देखील एकरी 6 हजार रुपयाचा दर असल्याने शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसणार आहे.

### पेरण्यांना वेग

» शेतीच्या कामांमुळे शहरासह तालुक्यातील शेतशिवार शेतमजुरांनी गजबजू लागल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळत आहे. दरम्यान, पावसाने अजून चार-पाच दिवस उघडीप दिल्यास पेरण्या मोठ्या प्रमाणावर उरकवण्यात येतील, असे बोलले जात आहे.